वर्ष ४२
अंक ८

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
|| मराठी तितुका मेळवावा ||

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक
ऑगस्ट २०२२

## अध्यक्षीय



नमस्कार मंडळी,

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (बृ. म. मंडळ/बीएमएम) २०१९-२०२२ सालातील कार्यकारिणीची अध्यक्ष म्हणून हे शेवटचे अध्यक्षीय लिहिताना मन भरून येते आहे. गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेला हा प्रवास ! आज मागे वळून पाहताना वाटतं,

"चालत चालत
किती दूरवर आलो आपण
मागे सोडुन दिले कुठे ?
द्वैताचे कुंपण"....

खरंच, गेली तीन वर्षे 'बृहन्महाराष्ट्र मंडळ'मय झालेलं माझं आयुष्य. यातला प्रत्येक क्षण डोळ्यासमोर अगदी जसाच्या तसा आहे. अध्यक्ष म्हणून या संस्थेची सूत्रे हाती घेताना सोबतीला होता फक्त सगळ्यांचा विश्वास आणि घेतलेल्या जबाबदारीची जाणीव!

जगभरातील मराठी मंडळांना जोडणारी, मराठी कला -संस्कृती जपणारी आणि मराठी कलावंत व भारताबाहेरील मराठी रसिक यांच्यातील दुवा असणारी ही सर्वोच्च संस्था. या कामाला अधिकाधिक विस्तृत आणि लोकाभिमुख करणे हेच प्रमुख ध्येय मनाशी ठरवून आमची कार्यकारिणी कामाला लागली. मनातल्या असंख्य कल्पनांना प्रत्यक्षात आणण्याची संधी मिळणार, जे काही ठरवलं ते अगदी सुरळीत पार पडणार अशी खात्रीच होती. पण...

नियती व निसर्गाचे बेत मात्र काही वेगळेच होते. सगळ्या जगाची कडक परीक्षा पाहणारं न भूतो न भविष्यति असं 'करोना' नावाचं वादळ आलं आणि जगण्याचे सगळे संदर्भच या वादळाने बदलवून टाकले. कित्येक गोष्टी, माणसं आपण पावलोपावली गृहित धरतो, आपल्याही नकळत कितीतरी अहंकार आपण जपत असतो याची जाणीव करोनाने करून दिली. पण मागे न हटता या आव्हानाला पेलायचे ठरवले. सगळी मांडणी नव्याने करायला सुरुवात केली. स्वतःच्याच क्षमतांची नवी ओळख होऊ लागली. झूम (Zoom)चे ऑनलाईन व्यासपीठ कामाला आले आणि एकाहून एक अशा सरस कार्यक्रमांना सुरुवात झाली. मग त्यात अमेरिकेतील नवनव्या मराठी लेखकांची ओळख करून देणारा 'लेखक तुमच्या भेटीला' असो, दर महिन्यातील मानसिक स्वास्थ्यावरील व्याख्यानं असो, ज्येष्ठांसाठी 'उत्तररंग' असो, कुमारांसाठी घेतलेले उपक्रम असोत घरात राहूनही दर्जेदार कार्यक्रमांचा आनंद रसिकांना घेता आला. बीएमएम कराओकेची सुरुवात झाली आणि धमाल मैफिली रंगायला लागल्या. लग्नसंस्था हा मराठमोळ्या घरांतील जिव्हाळ्याचा विषय. अमेरिकेतील मराठी उपवरवधूंचा एकमेकाशी परिचय व्हावा यासाठी 'रेशीमगाठी' संकेतस्थळाची सुरुवात केली.अल्पावधीतच त्यासही उत्तम प्रतिसाद मिळाला. करोना-काळातच सुरू केलेली BMM Helpline तसेच कलावंतांच्या रखडलेल्या व्हिसा प्रक्रियांचा थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत जाऊन केलेला पाठपुरावा कामाचे समाधान देऊन गेला. बीएमएम ग्लोबलायझेशनचे पाहिलेले भव्य स्वप्न प्रत्यक्षात उतरायला सुरुवातही झाली. आज उ. अमेरिका व कॅनडाबाहेरील तीन मराठी मंडळं बीएमएमशी जोडली गेली आहेत. या सर्वांवर कडी म्हणजे बीएमएमचे दर दोन वर्षांनी (यावेळी तीन वर्षांनी) संपन्न होणारे हे अधिवेशन. हा उत्सव 'सोहळा अस्तित्वाचा' हे घोषवाक्य घेऊन यावर्षी न्यू जर्सी येथे होणार आहे. जय्यत तयारी झालेली आहे. आयोजकांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. मंडळी, आतापर्यंत आमच्या कल्पनांना तुम्ही जी दाद दिलीत तशीच दाद आणि प्रतिसाद या अधिवेशनालाही नक्की द्या.

आज विचार करताना वाटतं, या तीन वर्षांत काय कमावलं? नाही, बँक खात्यात काहीच भर पडली नाहीय. पण श्रीमंती वाढली खरी! ही श्रीमंती आहे विविधरंगी अनुभवांची, जोडल्या गेलेल्या माणसांची आणि अनेक सुंदर आठवणींची. या प्रवासात ज्यांची ज्यांची मोलाची साथ लाभली त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. आज निरोप घेताना डोळ्यांत अश्रू आहेत आणि ओठांवर सार्थकतेचे हसू. कुसुमाग्रजांच्याच शब्दांत सांगायचे तर-

"तो प्रवास सुंदर होता, आधार गतीला धरती
तेजोमय नक्षत्रांचे, आश्वासन माथ्यावरती"

पुन्हा नक्की भेटू; एका नवीन प्रवासातल्या नव्या वळणावर. तोपर्यंत अलविदा!

आपली नम्र
**सौ. विद्या रवींद्र जोशी**
(अध्यक्षा, २०१९-२०२२, बृ.म.मंडळ, उत्तर अमेरिका)

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** -विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-**
**BMM Treasurer - Sona Bhide**
**3574 S. Marion Way, Chandler, AZ 85286**
Ph- (480) 812-9511 (PST) Email- sona.bhide@bmmonline.org
**वर्गणीचे दर:- Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription


**जाहिरातींचे दर**

पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा.**
**प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.**
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.
पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२२)**
**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:-** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **सचिव:-** | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष:-** | सोना भिडे | फिनिक्स, ॲरिझोना |
| **सदस्य:-** | मिलिंद बावडेकर | ॲटलांटा, जॉर्जिया |
| | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| | शिल्पा कुलकर्णी | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:-** अविनाश पाध्ये, बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स्
**वृत्त संपादक:-** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष :-** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन
**सदस्य :-** नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
**सदस्य :-** सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट
...



**प्रकाशक:-** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
**संकेतस्थळ:-** https://www.bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.



**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:-**
vinata@gmail.com or vinatak.bmmvrutta@gmail.com
Address: 3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503


# या अंकात...


| | पान क्र. |
|---|---|
| - अध्यक्षीय | १ |
| - Matrimonial | २ |
| - BMM Income & Expenditure Statement | ३ |
| - बृ.म. मंडळ अधिवेशन २०२२ वार्ता | ४ |
| - बृ.म. मंडळ अधिवेशन २०२४वार्ता | ५ |
| - कविता:- नभीचे पक्षी | ६ |
| - कविता:- 'निसर्ग ' , 'दिनविशेष आज' | ७ |
| - लेख:-'क्रोल झिर्कोनियम पुरस्कार' विजेते डॉ आनंद गर्दे | ८ |
| - कविता:- 'जगदीशाची याचना' | ९ |
| - उत्तररंग | |
| - बृ.म.मं. २०२२ अधिवेशनाविषयी लेखनाचे आवाहन | १० |
| - Business Advertisements | ११-१२ |
| - ऑनलाईन :- पुरवणी विभाग- लेख- 'परू'चा प्रवास राशिभविष्य:- ऑगस्ट, २०२२ | १४-१७ |


## MATRIMONIAL


**Hindu Marathi Girl**

**Age- 43, Height- 5'6"**

**Education: The Bachelor of Business Administration (BBA- in Management Information Systems)**

**In the US, looking for a suitable alliance from a well cultured family. Green card in the final stage.**

**Contact:-**
**Email - tipnisk@gmail.com**

# BMM - Income & Expenditure Statement for the year ending 6/30/2022

**Bruhan Maharashtra Mandal of North America, Inc**

(Established in 1981) TAX ID: 36-3148598 www.bmmonline.org

President: Vidya Joshi (Chicago, IL) vidya.joshi@bmmonline.org


Treasurer: Sona Bhide (Phoenix, AZ) sona.bhide@bmmonline.org

**INCOME & EXPENDITURE STATEMENT for the year ended 6/30/2022**
**(Cash Basis)**

| | | | |
|---|---|---|---|
| **INCOME:** | | **AMOUNT** | |
| **Mandal Membership** | | 4,830.00 | |
| **India Programming** | | 1,400.00 | |
| **Reshimgathee Annual Subscription** | | 8,500.00 | |
| **BMM Newsletter Vrutta** | | | |
| Annual Subscription | 350.00 | | |
| Advertisement | 100.00 | 450.00 | |
| **BMM Bazaar (**Books + DVDs**)** | | 114.36 | |
| **BMM Marathi Shala (**Exam Fees**)** | | 23,540.00 | |
| **Website Advt** | | 300.00 | |
| **Donation** | | 514.32 | |
| **Bank Interest** | | 11.33 | |
| **Total Income** | | **39,660.01** | **$39,660.01** |
| **EXPENSE:** | | **AMOUNT** | |
| **BMM Newsletter Vrutta Printing** | | 2,334.48 | |
| **Natya Mahotsav 2020 Residual Expenses** | | 225.00 | |
| **Reshimgathee (**Mailing**)** | | 30.64 | |
| **BMM Marathi Shala** | | | |
| Online subscription | 1,251.90 | | |
| Competition Awards | 270.00 | 1,521.90 | |
| **Administration** | | | |
| D&O Insuarance | 1,530.00 | | |
| License & Fees | 17.00 | | |
| Business Expenses | 1,410.89 | | |
| **Paypal charges** | 850.08 | 3,807.97 | |
| **Total Expense:** | | **7,919.99** | **($7,919.99)** |
| **NET SURPLUS (P&L Only)** | | | **$31,740.02** |
| **Deferred Loss in Investment due to Mkt Fluctuations** | | | **($82,141.67)** |
| **NET DEFICIT** | | | **($50,401.65)** |

# बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन न्यू जर्सी (ऑगस्ट ११-१४, २०२२)

**- प्रशांत कोल्हटकर** (न्यू जर्सी), बृ. म. मंडळ अधिवेशन २०२२, संयोजक



नमस्कार मंडळी,

**वऱ्हाड निघालंय अटलांटिक सिटीला**
**चला चला अधिवेशनाला चला**

गेल्या दोन वर्षांपासून मी नियमितपणे अधिवेशनाच्या कामाचा आढावा प्रत्येक महिन्याला तुमच्यासमोर सादर करीत आलो आहे. आता ह्या कामाची सांगता होण्याची मंगल घटिका जवळ आली आहे. गेल्या दोन वर्षांत ह्या वृत्ताच्या माध्यमातून तुम्हा सर्वांसोबत एक नवे नाते निर्माण झाले. वेळोवेळी मला सूचना आणि प्रोत्साहन दिल्याबद्दल मी तुमच्या सर्वांचे मनापासून आभार मानतो.

आता अधिवेशनाच्या शेवटच्या महिन्याच्या आढाव्याकडे वळूया. अधिवेशनाच्या बहुतांश समित्यांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. प्रत्यक्ष अधिवेशनाच्या काळातील चार दिवसांचा पूर्ण आराखडा डे ० (११ ऑगस्ट) ते क्लोजिंग डे (१४ ऑगस्ट) पर्यंत सविस्तर वेलापत्रकानुसार तयार आहे. आपापल्या समित्यांच्या कार्यावर कामाचा शेवटचा हात फिरवण्यात सगळे व्यस्त आहेत.

सुमारे ४२०० रसिक मंडळी या अधिवेशनाला उपस्थित असतील. इतक्या अतिथींसाठी नोंदणी सुरळीत करण्यासाठी आम्ही १० ऑगस्टपासून कन्व्हेन्शन सेंटरमध्ये रजिस्ट्रेशन काऊंटर उघडणार आहोत. जर तुम्ही डे १ ला येण्याची योजना आखत असाल, तर नोंदणी काऊंटर १२ ऑगस्टला सकाळी ७ वाजल्यापासून सुरू असेल. कृपया तुमच्याकडे तुमचा नोंदणी ईमेल आणि फोटो -ओळखपत्र तयार ठेवा, जेणेकरून आम्हाला रजिस्ट्रेशन प्रक्रिया अत्यंत सुलभ व जलदपणे होण्यास मदत होईल. प्रत्येक उपस्थितांना अधिवेशन नोंदणी ओळखपत्र मिळेल. त्यात तुमचे नाव, गावं, राज्य आणि पॅकेज तपशील व डे 0 पर्याय असतील. अधिवेशनादरम्यान आपल्या सर्वांकडे नेहमी नोंदणी ओळखपत्र असणे बंधनकारक आहे. प्रत्येक उपस्थितांना गिफ्ट बॅग मिळेल ज्यामध्ये स्मरणिका आणि इतर अधिवेशनाशी संबंधित माहिती-पत्रके असतील. डे 0 ला उत्तररंग, CME, Holistic Wellness आणि BIZCON हे पूर्ण दिवसाचे कार्यक्रम आहेत, त्यासाठी वेगळी नोंदणी आवश्यक आहे. जे लोक संपूर्ण अधिवेशनाला उपस्थित राहू शकत नाहीत त्यांच्यासाठी -

शनिवार १३ ऑगस्ट रोजी फक्त एक दिवसाचा पास उपलब्ध करून देत आहे. अधिक तपशील आणि नोंदणीसाठी - संकेतस्थळ: **https://bmm2022.org/saturdayonly/** आमच्या ज्येष्ठ पाहुण्यांसाठी व्हीलचेअरची सोय उपलब्ध करण्यात आली आहे. चाइल्ड केअरसाठी मुलांची नोंदणी केलेल्या पालकांसाठी सर्व तीन दिवसांसाठी चाइल्ड केअर सुविधा उपलब्ध असेल. तुम्ही अजूनही तुमच्या मुलांची चाइल्ड केअर नोंदणी करू शकता. आपल्या अधिवेशनातील पूर्ण जेवणाचा मेनू पाहण्यासाठी संकेतस्थळ:-**https://bmm2022.org/food-bmm2022/** सादर होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे वेळापत्रक सर्वांनी कृपया **https://bmm2022.org/schedule/ या संकेतस्थळावर पहावे.** **कार्यक्रम व वेळापत्रकात काही अनपेक्षित अपरिहार्य कारणांनी बदल होऊ शकतो याची कृपया नोंद घ्यावी.**

अधिवेशनात आपण आपल्या समुदायातील **COVID** च्या काळातील **"First Responders"** अशा नागरिकांचा सन्मान करत आहोत, ज्यांनी रात्रंदिवस सतत काम केले आणि आपल्या सारख्या लोकांचे जीवन सुरक्षित आणि आरामदायी व्हावे ह्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घातला. शनिवार १३ ऑगस्ट रोजी आम्ही ह्या सन्मानप्राप्त लोकांसाठी "विज्ञान मिरवणूक" काढण्याची योजना आखली आहे. त्यांच्या कार्याला मनापासून दाद देण्याची ही उचित संधी असेल.

अधिवेशन **"Go Green"** असावे असा आमचा प्रयत्न आहे. हे मी ह्याआधीच्या काही वृत्तामध्ये नमूद केले आहे. मला आशा आहे, की सर्व उपस्थित रसिक आमच्या प्रयत्नांची कदर करतील आणि आमच्या टीमने अधिवेशनाच्या दिवसासाठी तयार केलेल्या मूलभूत नियमांचे आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून आम्हाला मदत करतील.

गेली दोन वर्षे माझ्या समितीच्या सदस्यांनी आणि स्वयंसेवकांनी त्यांची दैनंदिन कामे सांभाळून समर्पण, वचनबद्धता आणि अमूल्य वेळ देऊन कठोर परिश्रम केले आहेत. संस्मरणीय संमेलन करण्याचे आमचे स्वप्न पूर्ण करण्याची वेळ आली आहे. आता हे अधिवेशन यशस्वी होण्यासाठी तुमच्या पाठिंब्याची आणि आशीर्वादाची गरज आहे.

चला तर मग तुम्ही आम्ही मिळून रचू एक नवा इतिहास आणि होऊ एका ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार. आम्ही सर्वच आपल्या भेटीसाठी उत्सुक आहोत. **Welcome to BMM 2022** !

***

# बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२४ वार्ता

- **प्रकाश भालेराव** (सॅन फ्रान्सिस्को बे एरिया), बृ. म. मंडळ अधिवेशन २०२४, संयोजक



नमस्कार मंडळी,

सर्वप्रथम बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (बृ.म. मंडळ/बीएमएम) सर्व कार्यकारिणीचे, २०२४ चे बृ.म. मंडळ अधिवेशन महाराष्ट्र मंडळ बे एरीया'ला दिल्याबद्दल, मनःपूर्वक आभार! वॉशिंग्टन डी.सी. आणि मिनेसोटा येथील मराठी मंडळांना जरी ह्या वेळी ते आयोजित करता येणार नसले, तरी आपण सारे एकत्र येऊन हे अधिवेशन साजरे करूया. ह्याचे आग्रहाचे निमंत्रण पण महाराष्ट्र मंडळ बे एरीया तर्फे त्यांना मी आत्ताच देतो! आणि हे अजिबात तोंडदेखलं नाही.

ह्या अगोदर, १९९९ मधे, म्हणजे जवळजवळ २५ वर्षांपूर्वी, दणक्यात झालेले बे एरियातले बृ.म. मंडळाचे अधिवेशन आपल्या काहींच्या आठवणीत असेलच.

"लक्ष्मी सरस्वती ह्या दोघी सवती
श्री गणेशा पुढे जोडीनं लवती"

अशा त्या विघ्नहर्त्या श्री गणेश, लक्ष्मी, आणि सरस्वती म्हणजे बुद्धी, धन आणि विद्येच्या देवतांना सर्वप्रथम वंदन करून आणि ह्यांचाच सदैव वरदहस्त लाभलेल्या सॅन फ्रान्सिस्कोच्या भूमीचे, आणि तिथे राहणाऱ्या सर्व मराठी प्रेमी मित्रमंडळींचे, आपल्या सर्वांना बीएमएम २०२४ च्या अधिवेशनाचे सस्नेह निमंत्रण! भेटीगाठी, भरगच्च काव्य, शास्त्र, विनोद, आणि खाण्यापिण्याची चंगळ असा बेत आखत आहोत. अमेरिकेपासून ते पुण्यामुंबईबरोबरच, महाराष्ट्राच्या सर्व गल्लीबोळातून, सर्वांचे कोणी ना कोणी आप्तेष्ट सिलिकॉन व्हॅलीत आहेतच. त्यांना भेटायला या! येथे सिलिकॉन व्हॅलीत, खूप काही पाहण्यासारखे आणि खूप शिकण्यासारखे आहे. जरूर याच!

गर्जे मराठी, द इंडस् आन्त्रप्रेनोर्स (The Indus Entrepreneurs) आणि इथल्या माझ्या व्हेंचर कॅपिटल इंडस्ट्री मधील मराठी मित्रांच्या सौजन्याने, अधिवेशनाअगोदर होणाऱ्या व्यावसायिक परिषदेसाठी (Business Conference) जगातील सर्व कानाकोपऱ्यातून नावाजलेले जवळजवळ १५० मराठीप्रेमी- business tycoons, CEOs, company owners यांना एकत्र आणण्याचा विचार आहे. ह्यातून एकमेकांशी ओळखी वाढतील. त्यांचे आपसातले बिझिनेस तर वाढतीलच, पण येथल्या तरुण मराठी मनांना नव्या व्यवसायांची चालना मिळेल.

अधिवेशनाची कार्यकारिणी स्थापन झालेली आहे.




**छायाचित्रात - डावीकडून:- बसलेले- मंगेश जोशी, अनिता कांत, प्रकाश भालेराव, अंजली गांधी, अजय पटवर्धन**
**उभे- सुनील गानू, भास्कर रानडे, अभिजीत घोलप, हेमंत हब्बू, मुकुंद मराठे, विनायक फडणवीस, (विराज राऊत- अनुपस्थित).**

या कार्यकारिणीतील सर्वांनी आजी-माजी महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी सांभाळली आहे. तसेच ईस्ट बे मराठी मंडळ, सेवा, रेशीमगाठी, उत्तररंग, स्वरसुधा, मैत्री, नाट्यसरगम आणि मराठी मंडळाचे असंख्य वेगवेगळे उपक्रम ह्यासाठी ते सर्वांच्या परिचयाचे आहेत. येथील सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात तावून-सुलाखून निघालेले महाराष्ट्र मंडळ बे एरियाचे हे सर्व धडाडीचे कार्यकर्ते अधिवेशनाच्या कार्यकारिणीत आहेत.

सल्लागार समितीत आहेत राष्ट्रीय चित्रपट पारितोषिक विजेते गायक श्री. महेश काळे, मराठीतील सुप्रसिद्ध अभिनेत्या श्रीमती अश्विनी भावे, राष्ट्रीय पुरस्कार विजेते "देऊळ" आणि "भारतीय" ह्या चित्रपटाचे निर्माते आणि पती-पत्नीच्या दोन वेगवेगळ्या कंपन्यांचे संस्थापक श्री. अभिजीत आणि सौ. गौरी घोलप हे दांपत्य, "कला" ह्या नावाजलेल्या आणि नाट्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थेचे एक संस्थापक श्री. मुकुंद मराठे, जगभरातील नावाजलेल्या सर्व मराठी नावांना एकत्र आणणाऱ्या, मराठी तरुणांना बिझिनेसमधे एंजल फंडाची चालना देणाऱ्या "गर्जे मराठी" या संस्थेचे आधारस्तंभ श्री. आनंद गानू ... the list goes on!

४००च्या वर स्वयंसेवकांची नावनोंदणी झाली आहे. जगप्रसिद्ध गुगल, फेसबुक, सिस्को, इन्टेल वगैरे आय टी कंपन्यांतील मोठमोठ्या हुद्यांवर असलेल्या अनेक मित्रमंडळींचा ह्यात हिरीरीने समावेश आहे. पुढच्या तयारीने जोर धरला आहे. हेही अधिवेशन दणक्यात होईल ह्यात वादच नाही. पण दुसरी तितकीच महत्त्वाची गोष्ट. काही महिन्यांपूर्वी ह्या अधिवेशनाच्या निमित्ताने जेंव्हा येथील उत्साही आणि वयाने तसेच मनाने तरुण मंडळी एकत्र आली, तेव्हा त्यात काही गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. येथे आता स्थिरावलेल्या समाजामधे काही ज्वलंत अडचणी निर्माण होत आहेत! ज्येष्ठ नागरिकांचे काही प्रश्न आपल्या सर्वांनाच कधी ना कधी भेडसावणार आहेत. किंवा H1-H4 व्हिसा वर असलेल्या कुटुंबांची द्विधा मनःस्थिती आणि त्यांची "for here, or have to go" ही कोंडी, अशी निराशेत ढकलणाऱ्या मनःस्थितीची दोन उदाहरणे. अधिवेशनाच्या निमित्ताने, आणि नंतरही, ह्यावर काही भरीव काम करता येईल का? हे विचारात घेणे आणि काहीतरी ठोस पाऊले उचलण्याचा निर्णय घेणे महत्त्वाचे आहे.

तुमच्या सहकार्याने आणि उत्साहाने अधिवेशन तर धडाक्यात होईलच. प्रश्नच नाही! पण इथल्या सर्व सिलिकॉन व्हॅलीच्या उत्साही मंडळींनी ह्यातली कुठलीही एक मोठी दूरगामी सामाजिक जबाबदारी अंगावर घेतली तर मला स्वतःला ही सर्व मेहनत सार्थकी लागली असेच वाटेल.

परत एकदा, बृ.म.मंडळ कार्यकारिणीचे मनापासून आभार आणि तुम्हा सर्वांना परत एकदा २०२४ अधिवेशनाचे आग्रहाचे निमंत्रण! भेटूया, सिलिकॉन व्हॅलीत, BMM 2024 Conventionला!

नमस्कार.

***

## बृहन्महाराष्ट्र वृत्त- ऑनलाईन विभाग

**- पुरवणी विभाग:- लेख- 'परू'चा प्रवास**

**- संजय जोशी** (हॅमिल्टन, न्यूझीलँड)

**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

**- राशिभविष्य:- ऑगस्ट २०२२**

**- दादा दामले** (न्यू जर्सी)

**https://bmmonline.org/rashi-bhavishya/**

**१५ ऑगस्ट**

**भारताच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त**

**शुभेच्छा!**

## नभीचे पक्षी

**- शिल्पा कुलकर्णी** (लुइविल्, केंटकी)



पक्षी उडाले आकाशी
घेऊन अपेक्षांचे पंख
मन आकाशीची निळाई
माखून फुलोऱ्याचे सुख

विझून गेले दीप अंतरीचे
न कळे कधी हरवली ज्योती
पक्षांना वेध सप्तरंगीचे
विखुरली माणिक मोती

लोपली निळाई नभीची
आस तरीही ना निमाली
ओसंडिली झोळी आसक्तीची
हौस तरीही ना फिटली

नीलवर्णी अन् सप्तरंगीचे
खुले दालन फिरण्याचे
पक्षांस कधी अंतरंगीचे
दिसेल का दृष्य निळाईचे ?

***

## निसर्ग



- **कांचन गोडबोले**
(क्लीव्हलँड, ओहायो)

**२८ जुलै
जागतिक
निसर्ग-संवर्धन-दिनानिमित्त
विचार**

पक्षांच्या किलबिलाटासह होते सुंदर पहाट,
अनेक पक्षांचा मधुर नाद वाटतो निरागस गोंगाट

ऋतूंचे बांधले उत्तम वेळापत्रक,
ऋतुराज सृष्टीचा महत्त्वाकांक्षी व्यवस्थापक

फुलपाखरांचे जीवन असते स्वच्छंदी,
बदलाचा स्वीकार करून पुन: होते आनंदी

कळीतून आकार घेते प्रत्येक फूल,
स्थित्यंतरातून गवसते जन्ममरणाचे मोल

अनेक पानांची हिरवीगार डहाळी,
एकात्मतेतून मिळणारी गंमतच निराळी

प्रत्येकाला सावली देतो एक मोठा वृक्ष,
सावली देताना माहीत नसतो त्यांस माणसाचा पक्ष

वारा वाहतो आणि करतो आपणां सचेतन,
सेवाभावाने काम करताना मागत नाही वेतन

अखंड चालू नदी आणि सागराचा प्रवास,
प्रत्येक जीवाला पाणी देणे हाच त्यांचा श्वास आणि ध्यास

पर्वतरांगा आणि खंबीर शिखरे,
शूरवीरतेचे लाभले बळकट सखेसोयरे

चंद्रताऱ्यांच्या महतीला नाही कशाची तोड,
दिवस आणि रात्रीची होणार कशी फोड ?

सूर्याचे अतुलनीय कार्य महान,
माणूस त्यापुढे खूपच लहान

पृथ्वीमातेला विश्रांतीची नाही मर्जी,
पिढ्यानपिढ्या फिरत राहून घेते प्रत्येक मुलाची काळजी

निसर्गाचे सान्निध्य हेच माणसाचे अस्तित्व,
त्याला जतन करणे हे आपल्या आयुष्याचे महत्त्व !

***

## दिन विशेष आज!



- **प्रिया गोडबोले**
(एडिसन, न्यू जर्सी)

**भारताच्या पंचाहत्तराव्या स्वातंत्र्यदिनानिमित्त
एक प्रांजळ कबुली!**

कधीच नाही लढलो मी स्वातंत्र्याचे युद्ध
कधीच नाही चालवली चळवळ कुठली खुद्द
कुणीच नाही ओळखीचे धरातीर्थी झालेले
तरीही मन भरुनी येते ह्या विशेष दिवशी माझे

हरित वनातून श्वेत ढगातून उगवी भगवा सूर्य
निळ्या नभाच्या आरशांतले लखलखते प्रतिबिंब
तोच तिरंगा निसर्गातला, घे अभिमानी सलामी
नतमस्तक होऊन एक मनाने शरण जाऊया चरणी

निधड्या छातीने लढलेले सैनिक वाटे आज हवे
रचिली असतील कारस्थाने कशी काय ते सांगावे
काय असावे देशासाठी लढणे, त्यांनीच शिकवावे
त्रिवार वंदन करुनी त्यांसी, अंतःकरण व्यापुन जावे

शिकलो भाषा कैक, शोधल्या वाटा तंत्रा-यंत्रांच्या
शिकलो नाही पूर्णतः मात्र देशप्रेमाची दैवी भाषा
जग फिरुनी मोजल्या भरगोस धनांच्या दुप्पट राशी
परंतु ना मोजता आले, घाव मायभूमीच्या माथी

किती पाहिले देश, आणि पश्चिमेची संस्कृती
ह्यात माझ्या मातृभूमीची मात्र पहिली वर्णी
ओल्या मातीच्या सुगंधाने येतोच ऊर भरून
गद्‌गद् होवून अश्रूधारा कंठ येतो दाटून

आता वाटते लढुया थोडे हक्कासाठी आपुल्या
चळवळीतही सामील होण्यां, नवे गडी सांधुया
धरातीर्थी नाही तर नाही, दृष्टीतला अंगारच पुष्कळ
मन भरुनी यावे ह्या विशेष दिवशी, हीच इच्छा प्रबळ !

***

# क्रोल झिर्कोनियम (Kroll Zirconium) पुरस्कार विजेते डॉ. आनंद गर्दे

**- डॉ. अरुण जतकर** (मन्रोविल्, पेन्सिल्वेनिया)

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या द्वैवार्षिक अधिवेशनांचे (Biennial Conventions of BMM) दीर्घकालीन साह्यकर्ते डॉ. आनंद गर्दे यांना दि. २२ जून २०२२ रोजी ऑटवा, कॅनडा येथे २०१९ सालाचा 'क्रोल झिर्कोनियम पुरस्कार' मिळाला आहे. त्याबद्दल डॉ. आनंद गर्दे यांचे मन:पूर्वक अभिनंदन!




छायाचित्रात ए.स.टी.एम. (ASTM International) चे क्रोल पुरस्काराचे प्रमाणपत्र (Certificate) आणि क्रोल पुरस्कार पदक यांसहित डॉ. आनंद गर्दे

डॉ. विल्यम जस्टिन क्रोल (१८८९ - १९७३) हा विसाव्या शतकातील एक महान धातुशास्त्रज्ञ समजला जातो. झिर्कोनियम धातूचे औद्योगिक प्रमाणावर (commercial scale) उत्पादन करण्याची प्रक्रिया त्याने शोधून पुढे विकसितही केली. त्याच्या नावाने "The William J. Kroll Zirconium Medal" (विल्यम जे. क्रोल झिर्कोनियम पदक) देण्याची संकल्पना त्याच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी अमेरिकेच्या ऑरगॉन प्रांतातील आल्बनी येथील 'वा चांग' (Wah Chang) या कंपनीने मांडली. झिर्कोनियम धातूच्या उत्पादनात व व्यावहारिक उपयोगात ज्यांनी महत्त्वाचे आणि अद्वितीय असे कार्य केले आहे त्यांना हे पदक द्यावे असा या पुरस्काराचा हेतु आहे. यासाठी उमेदवार निवडण्याची जबाबदारी एका आंतरराष्ट्रीय समितीवर सोपविण्यात आली. ह्या पुरस्काराचे शासन (administration) व आर्थिक नियमन ASTM International (पूर्वी "अमेरिकन सोसायटी ऑफ टेस्टिंग ऑफ मटीरियल्स" या नावाने ओळखली जाणारी ए.एस.टी.एम. इंटरनॅशनल) ही संस्था चालवते.

आण्विक ऊर्जा-निर्मिती (Atomic Energy Generation) क्षेत्रात झिर्कोनियम या धातूला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. संवर्धित (Enriched) युरेनियम डाय-ऑक्साईडच्या गोळ्या ($UO_2$ pellets) झिर्कोनियमच्या पोकळ नळ्यांमधे भरलेल्या असतात व न्यूक्लेअर रिॲक्टरमध्ये या नळ्या इंधन (fuel rods) म्हणून वापरल्या जातात.

डॉ. आनंद गर्दे मूळचे पुण्याचे आहेत. मुंबईच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजीमधून मेटलर्जिकल इंजिनियरिंगमध्ये १९६७ साली ते बी.टेक. झाले. अमेरिकेच्या न्यू यॉर्क प्रांतातील सिरक्यूज (Syracuse) युनिव्हर्सिटीतून त्यांनी त्याच विषयात एम.एस. ही पदवी संपादन केली. १९७३ साली युनिव्हर्सिटी ऑफ फ्लॉरिडामधून मटीरियल्स सायन्स या विषयात ते पीएच.डी. झाले. झिर्कोनियम धातूचे विविध प्रकारच्या ताण -तणावांनी विकलांगीकरण (Deformation) कसे होते, हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. शिकागोमधील आरगॉन नॅशनल लबॉरेटरी (Argonne National Laboratory – १९७४-७९), हार्टफर्ड, कनेटिकट येथील कंबश्शन इंजिनियरिंग (Combustion Engineering, १९७९-९०), तिथेच ए. बी. बी. (ASEA Brown Boveri, १९९०-२०००), कलंबिया, साऊथ कॅरोलायना येथे वेस्टिंगहाउस (२०००-२०१६) या सर्व ठिकाणी त्यांनी झिर्कोनियमशी संबंधित असलेल्या विषयांवर संशोधन केले. त्यांमध्ये प्रेशराइज्ड वॉटर रिॲक्टर व बॉयलिंग वॉटर रिॲक्टरमधील फ्युएल रॉड्सचे उत्पादन; झिर्कोनियमच्या गंज-प्रतिबंध-क्षमतेचे संवर्धन (enhancement of corrosion resistance); ऑक्सिजन, हायड्रोजन, आणि रिॲक्टरमधील किरणोत्सर्जन यांमुळे झिर्कोनियम धातूच्या वस्तु ठिसूळ होणे (embrittlement) आणि त्यावरील उपाय यांचा

समावेश होता. फ्युएल रॉड्सच्या कार्यक्षमतेत मौलिक सुधारणा, आणि रिॲक्टरमध्ये अधिक दर्जेदार काम करू शकणाऱ्या मिश्र धातूंचे (Zirconium alloys) उत्पादन, असे डॉ. आनंद गर्दे यांचे योगदान आहे. आजवर डॉ. आनंद गर्दे यांनी ए.एस.टी.एम. इंटरनॅशनलच्या ९ त्रैवार्षिक झिर्कोनियम परिषदा (Symposia) आयोजित केल्या आहेत. २०१६ साली वेस्टिंगहाउसमधून 'इंजिनियर एमेरिटस' म्हणून सेवा-निवृत्त झाल्यावर त्यांनी स्वतःची 'झिराश्री' नावाची कन्सल्टिंग कंपनी स्थापन केली.

विज्ञानाला साहित्याचे वावडे मुळीच नसते, याचा प्रत्यय डॉ. आनंद गर्दे यांच्या मराठी लिखाणातून आल्यावाचून राहत नाही. कॅनडातील टोरांटो येथून १९७८-ते- २०१९ या काळात प्रकाशित झालेल्या 'एकता' या मराठी त्रैमासिकात त्यांचे बरेच लेख प्रकाशित झाले होते. त्यांमधील लेखांचे 'विदेशी गुदगुल्या' हे संकलन मुंबईच्या ग्रंथाली प्रकाशनाने प्रसिद्ध केले. त्यास महाराष्ट्र सरकारतर्फे विनोदी वाङ्मय गटातील 'दत्तू बांदेकर' पुरस्कार २००२ साली मिळाला.

***

## जगदीशाची याचना

- **मुकुंद मार्तंड मोहरीर** (सॅन डिआगो, कॅलिफोर्निया)

हरे मुरारे जगदीशा रे
संकट सारे तूच निवारे

दुर्जन निर्दन पावन जीवन
सारे सुखीजन करी दयाघन

जळीं, स्थळीं अन् सांज-सकाळी
तूच सांभाळी हे वनमाळी

सकलाधारा तव आशिष धारा
मानव सारा आतुर चकोरा

जीवन सारणी तुझीच करणी
तुझ्या कारणी अर्पित चरणी

कोण कुणाला? काय कशाला?
कधी न सुटला हा गुंताळा

सत्य-सृष्टीच्या जंजाळातुन
मानवतेच्या कोल्हाळातुन
तोडुन अवघी दुःख-श्रृंखला
शाश्वत शांती दे तू सकला

जोवरी प्राण, कुडींत त्राण,
तुझीच जाण ...देई रे भगवान !

***

## उत्तररंग

**एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||**
**चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||**

**संदीप दीक्षित**- बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य, उत्तररंग नेतृत्व
**फोन क्र.** 1-216-926-6696 **ईमेल** sandeep.dixit@bmmonline.org
**विद्या जोशी** - अध्यक्षा, बृ. म. मंडळ
**फोन क्र.** 1-224-321-2948 ईमेल Vidya.Joshi@bmmonline.org

.........................................................................

**-संदीप दीक्षित** (उत्तररंग नेतृत्व, २०१९-२०२२)



मित्रमैत्रिणींनो,
बृहन्महाराष्ट्र मंडळ (बृ.म. मंडळ - बी एम एम) अंतर्गत उत्तररंग विभागातील अलिकडच्या दर आठवड्याच्या कार्यक्रमांचा शताब्दी सोहळा, बृ.म.मंडळ २०२२ अधिवेशनामधे ऑगस्ट ११ ला होत आहे – तो म्हणजे उत्तररंग संमेलन! १००वा कार्यक्रम, १०० आठवड्यांचे माझ्या सर्व सहकार्यांचे परिश्रम! अगदी पहिल्या सत्राच्या सुरवातीपासूनचे आत्तापर्यंतचे चित्र माझ्या डोळ्यासमोर उभे आहे. उत्तररंग २०१९-२२चा हा प्रवास कसा घडला याचे वर्णन करण्याचा प्रयत्न मी इथे करत आहे. यातून बी एम एम उत्तररंगच्या यशस्वी कार्यपद्धतीची संपूर्ण कल्पनां भावी २०२२-२४ समितीला यावी हा उद्देश.

वस्तुस्थिती ही आहे, की उत्तर अमेरिकेत मराठी उत्तररंग समाज नवीन आहे व संख्येने वाढत आहे. त्यांच्या गरजा वेगळ्या आहेत आणि मुख्य म्हणजे त्यांना दर आठवड्याला सोशलायझेशनची गरज आहे.

मी २०१९मधे उत्तररंग प्रकल्पाची सूत्रे हाती घेतल्यावर पहिल्या महिन्यात उत्तर अमेरिकेतल्या सर्व सक्रीय उत्तररंग कार्यकर्त्यांची एक सभा घेतली. त्या सभेस सुमारे १० जण उपस्थित होते.

आमच्या सभेमधे पुढील दोन वर्षात काय काम करायचे याची चर्चा झाली. त्यात give a ride आणि call a senior असे दोन उपक्रम हाती घ्यायचं ठरवलं. याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

त्यानंतर तीन महिन्यांनी (क्वार्टर) घेतलेल्या कार्यकर्त्यांच्या सभेत सुरवातीपासूनच्या टीममधली एकच व्यक्ती उरली होती. आम्ही दोघांनी मग सोशलायझेशनसाठी डिजिटल टेक्नॉलॉजी वापरायचे ठरवले. वॉशिंग्टन डी सी मंडळाच्या मदतीने आम्ही वेबेक्सवर दोन सत्र आयोजित केले. मला तेव्हा ही वस्तुस्थिती लक्षात आली, की ८-१० कुटुंबांसाठी मंडळाला दर आठवडा काय, महिन्यातून एकदाही असे कार्यक्रम करणे अवघड होईल. म्हणून आम्ही बी एम एम उत्तररंग ह्या राष्ट्रपातळीवर सत्र करायचे ठरवले.

मला आता अजून १-२ स्वयंसेवक मिळाले. फेब्रुवारी २०२० मधे क्लीव्हलँडमधील वक्त्यांचे सर्व मंडळांसाठी शनिवारी ३-५ या वेळेत तीन झूम सत्र आयोजित केले. त्याला १५-२० जण उपस्थित होते. याबद्दल माहिती मी 'BMM उत्तररंग Volunteers group'वर प्रकाशित करत होतो. उपस्थितांचा 'BMM उत्तररंग Connections' नावाचा WhatsApp group चालू केला.

२०२० च्या दुसऱ्या क्वार्टरमधे कार्यकर्त्यांच्या सभेला यावेळेस नवे ७-८ जण उत्साहाने पुढे आले. कनेटिकटचे - शैला कांबळी व ज्योती केळकर, क्लीव्हलँडचे मेधा गोडबोले व स्वाती साठे, ईस्ट बे एरियाचे वैशाली व योगेंद्र वाघ, सॅक्रॅमेण्टोचे अजित नातू लॉस एन्जलीसचे अविनाश साधू, आश्लेषा केळकर, व शीतल रांगणेकर, नेब्रास्काच्या छाया गयी, ह्यूस्टनच्या जोत्स्ना फडके, कॅलगरीचे अजय पवार. FEMAच्या Community Emergency Response Team (CERT) Training मधे शिकलेले Command Post Model वापरून मी Speaker, Hosting, Flyers, Publishing teams तयार केल्या आणि प्रत्येक टीममधे नेतृत्व, स्वायत्तता, जबाबदारी आणि सीमा स्थापन केल्या.

उत्तररंग- सत्रांना उपस्थितांची संख्या ४० वर पोहोचली तेव्हा आमचा आनंद गगनात मावेनासा झाला. २०२०च्या चौथ्या क्वार्टरमधे अजून स्वयंसेवक सहभागी झाले – विकाल बापट, गोविंद मोदी, मंजुषा नाईक, मौशमी रंगराजु, सुषमा आठवले, शुभदा वकनळ्ळी, अंजली भिडे, रणजीत कामत. बऱ्याच प्रेक्षकांनीदेखील सत्रांमधे भाग घेऊन अभिप्राय कळविले. उन्हाळ्यात एक दिवसाचे शिबीर आयोजित केले. त्याला ४००-४५० उपस्थित होते. उत्तररंग गटाचे गणपती व दिवाळी कार्यक्रमदेखील जोरात झाले. २०२१ मधे हळूहळू सत्रांमधे उपस्थितांची संख्या ५०-७५ पर्यंत पोहोचली. आम्ही गेमिंग टीम पण तयार केली. आम्ही आमची उत्तररंग विषयक कार्यक्रम-पध्दत वापरून तीन मंडळांना उत्तररंग शाखेची सुरुवात करून दिली.

मी तीन नियम सक्तीने पाळले. १) फक्त उत्तर अमेरिकेतले वक्ते २) सत्रांमधे जास्तित जास्त १०० प्रेक्षक/ zoom logins व ३) कुठलेही सत्र मुद्रित (ऑडिओ, व्हिडीओ रेकॉर्डिंग) करायचे नाही- यावर मी ठाम राहिलो. यामागे सत्र का व कसे पाहिजेत ही दृष्टी होती. प्रथम हे आठवड्याला एकत्र जमण्यासाठी व्यासपीठ आहे, उत्तर अमेरिकेत स्थायिक लोकांच्या कलागुणांच्या प्रदर्शनातून सोशलायझेशन व्हावे, स्थानिक मराठी लोकांनादेखील एक हक्काचे व्यासपीठ मिळावे, सत्र उत्साही वातावरणात व्हावीत आणि जास्तीत जास्त १०० उपस्थिती असावी. हा नियम केल्याने विविध स्थानिक उत्तररंग शाखा चालू राहून, त्यांस उपस्थिती लाभून त्यांना स्थानिक पातळीवर स्वतंत्र कार्यक्रम करणे शक्य होईल. वैजयंती करंदीकर - क्लीव्हलँड, मंजुषा नाईक – फ्लॉरिडा, सायली अमरापुरकर, राज, छाया गयी – मिडवेस्ट आणि सविता मोरे, स्वानंद कलुस्कर, वैशाली मानकर – नॉर्थवेस्ट अशा स्वयंसेवकांच्या नेतृत्वाने प्रांतिक शाखा (regional chapters) चालू केले.

२०२१ च्या चौथ्या क्वार्टरपासून अगदी ९९ सत्रांपर्यंत १०० झूम अकौंट्स म्हणजे साधारण १५० प्रेक्षक उपस्थित होते. या प्रवासात २५-३० स्वयंसेवकांच्या टीमला एकसंध एकसूत्र ठेवण्यासाठी FEMAचे Command Post model लक्षणीयरित्या यशस्वी ठरले. ही कार्यपद्धत स्वयंसेवकांनी संचालित समाजकेंद्रित संस्थांसाठी फार महत्त्वाची व आवश्यक आहे. यातून विविध प्रकल्प कसे चालू ठेवता येतील हे शिकायला मिळाले. यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे समाजकार्य आहे रॉकेट सायन्स किंवा कॉर्पोरेट वर्ल्ड नव्हे ह्याची जाणीव असणे!

मला हे काम करण्याची संधी दिल्याबद्दल मी बृहन्महाराष्ट्र मंडळाचा आभारी आहे. तुम्ही सर्वांनी दिलेल्या प्रतिसाद व प्रोत्साहनाबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

## बृ.म. मं. २०२२अधिवेशनाविषयी लेखनाचे आवाहन

अटलांटिक सिटी, न्यू जर्सी येथे ऑगस्ट ११-१४, २०२२ या काळात संपन्न होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाविषयी **उपस्थितांचे निवडक** लेख/प्रतिक्रिया (शब्द मर्यादा ५०० शब्द) सप्टेंबर व ऑक्टोबरच्या बृ.वृत्तात प्रकाशित करण्यात येतील. याविषयी आपले लेखन पाठविण्याची **अंतिम तारीख २५ ऑगस्ट २०२२**. लेखन **युनिकोड** मराठी फॉंट किंवा इंग्रजीत **ईमेलने** MS Word Or Text file attachment सह पाठवावे.

धन्यवाद!

- **विनता कुलकर्णी** (संपादक, बृहन्महाराष्ट्र वृत्त)

**Email:-** vinatak.bmmvrutta@gmail.com
vinata@gmail.com

**Greetings !**

**Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status.**

**You get a tax deduction and do not pay any commission.**
**You instruct and send, we deliver.**
**An affiliate ‘Foundation for Small Charity’ (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape.**
**India recipients of your giving need not be a registered charity.**
**Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive. They do not even need tax exemption (80-G,FCRA).**
**FSC is the answer. For more detail. Visit our Website “WWW.SmallCharity.Org” Or**
**Email to Admin@SmallCharity.Org**
**You will hear from:**
**Ramesh Sarva, CPA, 183 S. Broadway,#210, Hicksville NY 11801**

**Join Donor List**

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA,MD
KIRAN & NANDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR & ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLKAR
KASI & GEETHA GABBITA
RAJESH & SUMANA RAO
RAMESH GAONKAR
CHANDRA VARIA
NATWARLAL & KALI RAMANI
BHANJI & MANSI KUNDARIA
JITU & KOKILA PADALIA
DALSUKH & ILA MADIA
HIMAT & MINA TANK
MUKESH & VIBHA SHAH
SUMANT SNEHALATA PANDYA
MOHAN & RAMA PATEL
JAYENDRA & SAROJ SHAH
GOVIND & BHAKTI NADKARNI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
MAHARSHI KARVE FOUNDATION 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. CT SCAN AHMADNAGAR MH
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S.SAMITI, PUNE,PATHAK TRUST
COSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESHWAR MAHILA MANDAL
NIH
SAFETY CLUB, HYDERABAD, A.P.
G.D.TRUST
FUJI MAMMOGRAPHY-M P SHAH MEDICAL COLLEGE, JAMNAGAR, GUJARAT
M P SHAH MEDICAL COLLEGE MAMMOGRAPHY EQUIPMENT GIVING 200 TESTS A WEEK (10,400 A YEAR) FOR WOMEN TOWARDS EARLY DETECTION AND INTERVENTION WHICH IS NOT AVAILABLE IN NEARBY HOSPITALS
M P SHAH MEDICAL COLLEGE SCHOLARSHIPS
M P SHAH MEDICAL COLLEGE SCHOLARSHIPS
SHANTA DURGA TEMPLE, KAVLEM, GOA

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

**Subscription Remittance Address**
**BMM Newsletter**
**3574 S. Marion Way**
**Chandler, AZ 85286**

BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ

नाते जुळते मनाशी मनाचे




Reshimgathee
A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/

१९८२-२०२२
नीलम ऑडिओ, फूड व गिफ्टस्
NEELAM AUDIO & VIDEO INC.
उत्तर अमेरिकेतील ग्राहकांची ४० वर्षे अखंड सेवा

बी एम एम अधिवेशनात विक्रेत्यांच्या कक्षात आमच्या कक्षाला भेट द्या. तेथे पुस्तके, गिफ़्ट आयटेम आणि पोहा पापड, खरवस पावडर, चकली, आंबा वडी, फणस पोळी, खमंग चिवडा, इ. पदार्थ विक्रीस उपलब्ध असतील . दर जेवणानंतर केशररत्न मुखवास मोफत.

फिलाडेल्फियातील ४८ वर्षांच्या वास्तव्यानंतर आम्ही साऊथ जर्सीत स्थलांतर केले आहे. आमच्या नवीन पत्याची नोंद घ्या. 322 Hidden Acres Lane Moorestown NJ 08057

संपूर्ण कॅटलॉग www.neelam.com येथे पहा
+१ २६७ ९८१ ७१७० या क्रमांकावर whatsapp मेसेज पाठवून आपली ऑर्डर नोंदवा

# बृहन्महाराष्ट्र वृत्त - पुरवणी

## ऑगस्ट, २०२२

**(बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)**

# ‘परू’चा प्रवास



**- संजय जोशी** (हॅमिल्टन, न्यूझीलँड)

परू (काही मराठी लोक Peru या नावाचा उच्चार पेरू असा करतात) या देशाच्या माझ्या प्रवासाची मानसिक सुरुवात झाली नीलेश नीलकंठ ओक यांच्या ‘Sugreeva’s Atlas’ या व्याख्यानाने. आज कँडेलाब्रा (Candelabra - मेणबत्ती ठेवायचे घर) या नावाने प्रसिध्द असलेलं स्थळ सुग्रीवाला माहीत होतं आणि त्याचं सविस्तर वर्णन तो सीतेच्या शोधात पूर्वेकडे जाणाऱ्या त्याच्या दूताला करतो. श्री. ओक यांनी रामायणाचा कालखंड चौदा हजार वर्षांपूर्वीचा असल्याचा ब्ऱ्याच पुराव्यांनी सिध्द केला आहे. सुग्रीवाच्या वर्णनानुसार त्या काळी सुध्दा ते स्थळ प्राचीन होतं! तेव्हा मला त्या स्थळाने भुरळ पाडली यात नवल ते काय?

भाचीच्या कॅलिफोर्नियातील लग्नाच्या निमित्ताने जवळच्याच परू देशाला जाण्याचा निर्णय पक्का झाला. सुदैवाने पुलं नी (माझ्या माहिती प्रमाणे ) हा देश आम्हा पामरांसाठी वर्णन करायला बाकी ठेवला आहे. एरवी ‘जावे त्यांच्या देशा’, ‘अपूर्वाई’, ‘पूर्वरंग’ असल्या एकाहून एक सरस प्रवास वर्णनात्मक पुस्तकांमुळे अमेरिका, युरोप, अतिपूर्वेतले देश यांवर येरागबाळ्याने लिहिण्याचा प्रयत्न सुध्दा करू नये. अर्थात, ‘पूर्वरंग’ मध्ये त्यांनी वर्णन केलेले देश आणि आताची त्यांची प्रगती - विशेषत: शहरी सुविधांबाबत भारताच्या तुलनेत केलेली प्रगती - यांमुळे ती वर्णने काहीशी कालबाह्य वाटतात. पण आपण तो मुद्दा बाजूला ठेवूया.

एक कँडेलाब्रा आणि फार तर माचु पिचु एवढीच माफक अपेक्षा ठेवून परू देशाला भेट देणारा मी, बाहेर येताना देवाने दोनाच्या ऐवजी चार डोळे का दिले नाहीत या संभ्रमात होतो. ( तीन नकोत, नाहीतर आधीच राजकीय गदारोळात सापडलेला हा देश आगीने भस्मसात व्हायचा!)

लिमा परूची राजधानी. या राजधानीची बॅरांको, मेफ्लॉवर, सॅन इसिद्रो ही उपनगरे अमेरिकेतल्या सॅन फ्रान्सिस्को, बे एरियाशी स्पर्धा करतात. दोन मुख्य फरक. पहिला म्हणजे बे एरियावर इंग्लीश स्थापत्यशास्त्राचा प्रभाव आहे तर या उपनगरांवर स्पॅनिश. दुसरा फरक म्हणजे टूरिस्ट- नाच डोळ्यांसमोर ठेवून केलेली संरचना. टुमदार बुटीक (boutique) हॉटेल्स, रेस्टॅारंट्स, म्युझियम्स आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे दुकानं. कलाकुसरीचे विविध प्रकार - पॉटरी- कप, मग शोभेच्या खेळण्यांपासून कुंड्यांपर्यंत; विणकाम भरतकाम केलेले अल्पाका आणि सुती कपडे, वॉल हँगिंग्ज, उशांचे अभ्रे, शाली, टेबलस्प्रेड, लाकडी रंगीत, कोरीव काम केलेल्या वस्तू इत्यादी. वाटतं, किती बघू नी किती नको! बरेच दुकानदार स्वत: त्या वस्तू तयार करतात तर काही हातात मोजक्याच वस्तू घेऊन गिऱ्हाइकाच्या गळी माल उतरवायला मागे लागतात. त्यांचं मागे लागणं, अजिजी, घासाघीस यांची अनेकदा कटकट वाटायची. संगीतकला पण इकडे पाणी भरते. रेस्टॅारंटमध्ये एखादा कलाकार घुसणार; झाम्पोना पॅनपाईप छातीला आणि गिटार हातात! कधी तो पॅनपाईप वाजवणार तर कधी गिटार. कधी कधी दोन्ही एकाच वेळी वाजवणार. मधून मधून गाणार सुध्दा.

लिमामधलं लार्गेस हे म्युझियम पाहून डोळ्यांचं पारणं फिटतं. अडीच-तीन तासात कुंभारकाम, विणकाम, भरतकाम यांचे हजारो नमुने तुम्ही बघता. सोन्याची मोठमोठी नाणी बघून या देशाचा समृध्द भूतकाळ, स्पॅनिश लोकांची जवळ जवळ तीनशे वर्ष हा सगळा टापू ताब्यात ठेवायची धडपड यांचा संदर्भ लागतो.



१५२०- १५३० सालीच स्पेनच्या अधिपत्याखाली गेलेला देश, १८२० साली स्वतंत्र झाला. पण या तीनशे वर्षांत स्पॅनिश भाषेमुळे त्यांची भाषा पार लयाला गेली. नुसती भाषाच नव्हे तर त्यांची संस्कृती, देवदेवता केविलवाण्या अवस्थेत कॅथलिक धर्म , स्पॅनिश संस्कृती यांची बटिक होऊन कधीतरीच आपलं दर्शन भीत भीत देताना दिसतात. त्या मानाने भारताने जुल्मी, क्रूर मुसलमान/पोर्तुगीज आणि धूर्त, कावेबाज इंग्रज यांपासून आपली संस्कृती आणि धर्म पुष्कळ प्रमाणात अबाधित ठेवले.

कुसको या परूच्या दोन नंबरच्या शहराचं वर्णन मी पुस्तकात वाचलं की 'A city with remarkable Cathedral'. मला वाटलं की असेल लंडन नाहीतर अगदी व्हॅटिकन सारखं कॅथेड्रल. युरोपात असली कॅथेड्रल जागोजागी छळतात. इथे काय म्हणे प्रिन्सेस डायनाचं लग्न झालं. ज्या लग्नाची वाताहत आपणां सर्वांना ठाऊक आहे त्या लग्नाचा सोहळा कुठेही होवो, त्याचं काय कौतुक? पण कुसकोचा दिमाख तीन गोष्टीत आहे. एक म्हणजे भव्यता.

मूळ इंकांचं स्थापत्यशास्त्र दिसतं - काटेकोरपणे एक एक दगड कापून, मध्ये कुठलही सिमेंट न वापरता एकात एक गुंफून भली मोठी वास्तू उभी करायची. त्या वास्तूंचा स्पॅनिश लोकांनी आणखी प्रचंड विस्तार केला. एवढा केला, की एकाच छताखाली तीन तीन वेगळी कॅथेड्रल्स, त्यांच्या वेगवेगळ्या प्रार्थना एकाच वेळी होऊ शकतात! दुसरी गोष्ट, आधुनिक सरकारने नुसती वास्तूच टीपटॉप ठेवली नाही; तर सर्व आजूबाजूचा भाग, संपूर्ण मध्यवर्ती भागाचं मूळ स्पॅनिश व्यक्तिमत्व कायम ठेवलंय. प्रत्येक घर त्याच क्रीम रंगाचं आणि त्यांवर काळ्याच अक्षरात दुकान, रेस्टॉरंट इ. ची नावं लिहिलेली. तिसरी आणि सर्वात महत्वाची गोष्ट- जी कुसकोच नाही तर लिमा आणि इतर मुख्य शहरांमध्येही आढळते - अशा भागांमध्ये सामान्य जनता, गरीबातला गरीब माणूसही कमालीची स्वच्छता राखतो, तसंच कोपऱ्या कोपऱ्यावर पोलिस उभा असल्याने गुन्हेगारांवर वचक आहे .

परूतल्या या निवडक भागांखेरीज इतर भागांची काय परिस्थिती आहे? वाईट! १९८० - १९९० च्या दशकात दोन तथाकथित 'क्रांत्या' झाल्या.परिणाम? लोक धडाधड गावं सोडून शहरात आले. शहरात काय करायचं याची कल्पना नव्हती. जागा बळकवायची आणि घर बांधायला सुरुवात करायची. गावांमध्ये लोक एकमेकांना मदत करून घरं बांधली जायची. शहरामध्ये ते होईना. जागा बळकावी, शेणामेणाचं (खरं म्हणजे लाकडाचं )घर बांधावं. चार सहा वर्षांनी कायदेशीर करावं, मग इलेक्ट्रिसिटी येणार! अर्थार्जनाची बोंब, मग काय होणार? अर्धवट बांधलेली घरं, गरीबी आणि गुन्हेगारी! या विषमतेमुळे विषाद वाटतो, पण ज्या देशाला जास्तीत जास्त टुरिस्ट यायला हवे आहेत, ज्यांना प्रगत देशांमधल्या सुविधा पुरवायच्या आहेत त्यांना अशी समृध्दीची बेटे - दारिद्र्याच्या विशाल सागरात - बांधणे भाग पडले असेल का? या बेटांमुळेच त्यांना आपल्या समृध्द इतिहासाचे दर्शन घडवतां येते आणि कलाकारांच्या कारीगरीचे उत्कृष्ट नमुने विकता येतात हे तर खरेच. ही विषमता नुसती शहरात नाही तर गावात सुध्दा आहे.आम्ही एका द्राक्षाच्या मळ्यात दोन दिवस राहिलो होतो. 'मळा' ही उपाधी त्याचं वर्णन करायला अपुरी आहे. ६८० हेक्टर्स जागेवर तो पसरलेला! तुमची नजर जिथवर जाईल तोपर्यंत पसरलेला हा 'मळा' आणि त्यातलं ते सेव्हन स्टार हॉटेल; इटालीयन कुटुंबाच्या पाच पिढ्यांनी भर घालत घालत हे सगळं उभं केलेलं. त्यात मुख्यत: पिस्को नावाचं तब्बल सत्तर टक्के अल्कोहोल असलेलं मद्य तयार होतं. या मद्याचं साभिनय वर्णन एक मदिराक्षी स्पॅनिश मध्ये करत होती . मला स्पॅनिश भाषेचे आणि मद्याचे वावडे आहे, तरीही अनिमिष नजरेने तिचा अभिनय आणि लावण्य टिपत होतो.

एक गोष्ट मान्य करायलाच हवी की परूच्या या भागात मैलोन मैल वाळवंट पसरलेलं असतं आणि अचानक हिरवागार, बहुतेक वेळी द्राक्षाचा, मळा सुरू होतो. वाटतं, या मळ्यांना पाणी कोठून येत असेल? त्या मळ्यांमध्ये आणि काही ठिकाणी त्याला लागून असलेल्या हॉटेलमध्ये किती माणसे लागत असतील? अशा ठिकाणी काम करण्या ऐवजी माणसे बकाल शहरांमध्ये गर्दी का करतात? त्यांचं या मळ्यामध्ये शोषण होतं का? एक ना दोन. भाषेचा अडथळा केवढा मोठा असतो, असे व्यक्तिगत, नाजूक प्रश्न विचारायला तर फारच.

आपल्या बाळाने 'आज शी कशी छान केली' असं वर्णन आई ज्या पध्दतीने करेल त्याच अभिनिवेशाने परूवियन बॅलेस्टास बेटावरच्या पक्षांच्या विष्ठेचे वर्णन करतो. या विष्ठेमध्ये असा गुण आहे, की ती खत म्हणून अति उत्कृष्ट आहे. दर सात वर्षांनीच ती उकरायची व जगभर विकायची!

या बेटांकडे जाताना मधे लागते कँडेलाब्रा!! १२० मीटर उंच, २० मीटर रुंद आणि एक मीटर खोल. पक्षी यावर कधीही विष्ठा करत नाहीत. मेणबत्त्या ज्यात ठेवतात तसं ते दिसतं. याच्याबद्दल मी आधी लिहिलंच आहे. 'याची देही, याची डोळा अजि मी ब्रह्म पाहिले' अशा भावनेने मी डोळे भरून ते पाहत होतो. गाईड ( मला ठाऊक असलेली )माहिती सांगत होता, तेथून हलू नये असं मला वाटत होतं पण इतरांना बॅलेस्टासची बेटं, त्यावरचे ते पक्षी, पेंग्विन, सी लायन्स बघायची घाई झालेली. बेटांकडे जाताना लक्षात येते, की लाखो पक्षी बुफेला शिस्तीत रांग करून जावे, असे समुद्रापासून अगदी दोन तीन फुटांच्या उंचीवरून उडत होते. परू जवळच्या समुद्रातून थंड प्रवाह वाहतो. तो प्रवाह plankton वाढवतो. त्यांना मटकावायला मासे व माशांवर ताव मारायला पक्षी अशी ती साखळी आहे.

कँडेलाब्रा सारख्या, जमिनीवर कोरलेल्या आकृतीला Geoglyphs म्हणतात आणि या बेटांजवळ तो एकच आहे. पण वाळवंटात, थोडं दूर, Nazca Lines नावाने १३ मोठ्या Geoglyphsची लयलूट आहे. व्हेल, हमिंग बर्ड, रॉयल फॅमिली इ. त्या बघायला छोट्याशा विमानातून जायचे. विमान छोटं असण्याचा एक फायदा की प्रत्येकालाच खिडकीची जागा!

जवळात जवळून बघता यावं म्हणून विमान आलटून पालटून कलायचं आणि पोटात, विशेष करून भरल्या पोटात ढवळायला लागायचं. सुदैवाने म्हणा की दुर्दैवाने, माझं पोट बरोबर नव्हतं. सेव्हीशे - कच्चा,अजिबात न शिजवलेला मासा, आणि त्यावर भरपूर लिंबू, कांदा, मिरची यांनी माझी विकेट घेतली होती. अँटी डायरिया गोळी खिंड लढवत होती आणि जोडीला लंघन - फारतर पाणी. त्यामुळे पोटात ढवळण्याचा त्रास झाला नाही आणि मनसोक्त Nazca Lines बघता आल्या.

परू देशात सगळंच आहे, समुद्र, लागूनच वाळवंट, ॲमेझॉनचे जंगलातले खोरे , पुढे जावे तर अगदी उंचावर वसलेले कुसको आणि त्या दोघांमध्ये बसलंय माचु पिचु!

ॲमेझॉन नदी परूमध्ये मध्यम बांध्याची, खरंतर शिडशिडीतच आहे. पुढे ब्राझिलमध्ये ती फुगते. बरोबरच्या गाईड ला cayman ( मगर ) चं कौतुक, पण आपण भारतातल्या नद्यांमधे मगरी, सुसरी पाहिलेल्या असतात. खरी गंमत इकडच्या लॉजची! बाकी सुखसोयी छान पण खोलीला तीनच भिंती. रात्रभर निरनिराळे आवाज येत होते. गाईड म्हणाला, त्याच्या खोलीत एक फूट लांब आणि सहा इंच रुंदीचा गलेलठ्ठ उंदीर रात्री होता. त्याने उंदराला स्पॅनिश मध्ये समजावले की, 'गडबड करायची नाही' ! नशीब, माझी पत्नी शोभा हिने- ही गोष्ट ऐकली नाही. नाहीतर रात्रीच गोशा गुंडाळून पळून जायला भाग पाडले असते. ॲमझॉनचे प्राणी बहुभाषिक असावेत कारण माझा गायत्री मंत्राचा जप रात्रभर चालू होता व बहुधा तो ऐकून कुणीही आमच्या खोलीत आले नाही.

सकाळी, बोटीतून फिरताना आम्ही मकाव बघितले होते - सुंदर लाल आणि हिरवा रंग. स्पेशालिस्ट गाईडला खात्री होती की ते खाली, भिंत चाटायला येतील. आपण अगदी निवांतपणे वाट बघायची. बाकी कुणालाच उत्साह नव्हता. मी आणि तो स्पेशालिस्ट गाईड दबा धरुन गुपचुप झोपडीत बसलो. झोपडीच्या भिंतीला भोकं होती. अखेर प्रयत्नांती परमेश्वर! एक दोन नाही, सात मकाव आलटून पालटून भिंत चाटत होते. मकावच्या आहारात म्हणे क्षार कमी असतात आणि त्यांची भरपाई करायला ते डोंगराने केलेली नैसर्गिक भिंत चाटतात. स्पेशालिस्ट गाईडच्या आणखी काही कल्पना होत्या. ही भिंत म्हणे 'वधू वर सूचक मंडळ' आहे. एकमेकांशी कुजबुजून बोलायला, मातीचा घास भरवायला याहून चांगली जागा कुठली? ...माहोल है, मोसम है, फिर मौका क्यू छोडना?

एका बाजूला उंचावर वसलेलं कुसको आहे आणि दुसऱ्या बाजूला ॲमेझॉन जवळ जवळ समुद्र सपाटीला. या दोन्हीमध्ये वसलंय माचु पिचु! माचु पिचुचं फारच कौतुक आहे आणि त्याचं वर्णन वाचून मी सहा महिने सूर्य नमस्कार, Exercycle इत्यादी करून स्टॅमिना वाढवला होता. माचु पिचु पेक्षा मला जास्त आवडलं वाटेत लागणारं ollatantambo - उच्चार ओयाटानटॅम्बो (- डबल ल चा उच्चार म्हणे य करायचा. स्पेलिंग आणि उच्चार यांची गोची करण्यात स्पॅनिश फ्रेंचांचे भाऊ शोभतात). इंकांनी जे बांधकाम केलं (खरं म्हणजे करून घेतलं) त्याची तुलना इकडे त्यांच्या अगोदरच्या वारी या राजवटीने जे काम केलं त्याच्याशी केली, तर जमीनअस्मानाचा फरक दिसतो. दोन्ही राजवटींना येथे अप्रतिम काळा कुळकुळीत दगड मिळाला आणि माचु पिचुला काळसर राखाडी रंगाचा ग्रॅनाईट आहे. आधी वर्णन केल्याप्रमाणे अचूक कोरीव काम, तेही तंत्रज्ञान न वापरतां महाविशाल, अतिउंचावर इमारती उभ्या करणं अद्भुत आहे. निदान आमच्या बरोबरच्या अमेरिकनांना तसं वाटलं. संधी मिळताच शोभाचा रोष पत्करून वेरूळच्या लेण्याचं गुणगान केलं. त्याचं एका दगडातून अख्ख देऊळ तयार करणं, एकही चूक करायला मुभा नसणं, औरंगजेबाच्या सरदारांना ते फोडण्यात यश न येणं इत्यादी. दुसरं, त्यांना मी हेही सुनावलं, की माचु पिचु बनवताना गाइडनेच सांगितल्या प्रमाणे लोकांना वेठीला धरलं जायचं. जे सांगाडे सापडायचे त्याच्या अभ्यासावरून कारागिरांना आर्थायटीस, अतिश्रमाने होणारे आजार व्हायचे. आजाराने जर्जर झालेलं शरीर तिशीलाच मृत्युमुखी पडायचं. वेरूळ किंवा दक्षिण भारतातली देवळं यांबाबत असा कोणताही पुरावा नाही. घरी ऊठसूठ मुलाला धपाटे घालणारी आई, बाहेर मुलगा रस्त्यावरून पळत सुटला तर जीवाच्या आकांताने वाचवायचा प्रयत्न करते, तसा माझा आपल्या भारताची बाजू घ्यायचा प्रयत्न होता.

पण हेही खरं, की इंकांनी लांबच्या पर्वतांवरून पाणी आणून, दगडाची पन्हळ करून पायथ्याच्या गावांना पाणी पोहोचवलं; कुठलंही तंत्रज्ञान नसताना. ती व्यवस्था आजही नुसती कार्यरत नाही तर पुरेशी सुध्दा आहे.

परूच्या प्रवासात प्रचंड अडथळे आले. प्रत्येक वेळी वाटायचं की संपलं, ट्रीप बोंबलली. अगदी घरून एअरपोर्ट वर जाताना आला पहिला अडथळा. मी जरा स्वस्त म्हणून शटलच्या ऐवजी बसने जायचं ठरवलं. न्यूझिलँडमध्ये सरकारी, निम -सरकारी व्यवस्था चांगल्या असतात. नेमक्या याच दिवशी बस व्यवस्थेने धोका दिला. जो ड्रायव्हर ऑकलंड एअरपोर्टवरून बस घेऊन येतो तोच परत ऑकलंड एअरपोर्टवर जातो. मध्ये अर्धा तासाचा अवधी असतो. ती बसच आली नाही. कंपनीकडे अजून ड्रायव्हर नाही. बस सुटायची वेळ कधीच निघून गेली. आमची घालमेल. शोभाचे डोळे मोठ्ठे, फणफणणाऱ्या चेहऱ्यावर 'तरी मी सांगत होते' चा भाव! नचिकेतला फोन केला, अरे आम्हाला ऑकलंड एअरपोर्टवर सोडतोस का? तो थंड डोक्याने विचार करुन म्हणाला 'बाबा, ऑकलंड पर्यंत जाण्याएवढं पेट्रोल गाडीत नाही. ते भरायला वीस मिनिटं आणि आता ऑफिस सुटल्याची वेळ आहे. मला बस स्टॅाप वर यायला कमीत कमी दहा मिनिटं. '

त्याचं म्हणणं पटलं. फोनवर बोलता बोलताच बस येताना दिसली आणि मी याहूची आरोळी मारायचं बाकी ठेवलं होतं. बस आली पण ड्रायव्हसाहेब आणि काही प्रवासी उतरायचं लक्षण नाही. पोलिस मात्र बसमध्ये चढले. बसमध्ये ड्रायव्हर आणि पॅसेंजरचं भांडण की मारामारी झालेली. पंचनामा उरकून ड्रायव्हर मोकळे झाले तोवर मी रडकुंडीला आलेलो. ड्रायव्हर साहेबांना थोडक्यात माझी परिस्थिती सांगितली आणि विनंती केली, 'ड्रायव्हर साहेब, गाडी हाणा!' ड्रायव्हर साहेबांनी शब्द दिला, ' Don't worry, you will reach in time'. आणि चक्क तो पाळला! चेक इन होईस्तोवर आम्हाला प्रचंड धाकधूक! अमेरिकेत गेलो आणि आमची मोठी बॅग पोहोचलीच नव्हती. त्यात भाचीच्या लग्नात घालायचे कपडे होते. अगदी विकत घ्यायला गेलो तरी अमेरिकेत न मिळण्यासारखे. बॅग मिळेस्तोवर आमची मानसिक परिस्थिती बिकटच होती.

अमेरिकेतून परूला जाताना आम्हाला एअरपोर्टवर सांगण्यात आलं की तुम्ही affidavit (प्रतिज्ञापत्र) द्या की तुम्ही कोव्हिड लसीकरण केलंय आणि सध्या तुम्हाला कोव्हिडची लक्षणं नाहीत. मी म्हणालो, 'हात्तीच्या, फॉर्म द्या, भरून टाकतो.' न्यूझीलँडमध्ये असा फॉर्म मी प्रचंड घाईघाईत भरला होता. माझ्याकडे वॅक्सिन सर्टिफिकेट होतंच, तसंच कायद्याने जरुरी नव्हती तरी भरमसाठ पैसे देऊन कोव्हिडची saliva rat test केली होती. तर, ते सांगतात काय, फॉर्म ऑनलाईनच भरायचा. माझ्या मोबाईलवर वेबसाईटच उघडेना. जाम प्रयत्न केला. त्यांना विनंती केली, तुमच्या कॉम्प्युटरवर फॉर्म उघडा, मी भरतो. उत्तर आलं नाही. अंजू, माझी बहीण, तिच्याच मुलीच्या लग्नाला गेलो होतो. तिला फोन केला तर ती आधी म्हणाली तुझ्या ट्रॅव्हल एजंटला फोन कर. न्यूझीलँडमधे त्या वेळी असणार अडनिडी वेळ. ट्रॅव्हल-एजंट फोन उचलणारच नाही हे ठाऊक होतं. शेवटी माझं I pad काढलं. त्यात वेबसाईटला जाणं, फॉर्म उघडणं जमलं. पण फॉर्म होता स्पॅनिशमध्ये. एअरलाईन काऊंटरवर कुणीही मदत करायला तयार नाही. त्यांना म्हणे स्पॅनिश येत नव्हतं. ती भाषा पण मजेशीर आहे. Nombre वाचून आपल्याला वाटेल की नंबर विचारतायत आणि आपण पासपोर्ट नंबर घालू,पण त्याचा अर्थ नेम, अर्थात, नाव -निघायचा. काऊंटरवरचे लोक शांतपणे आमची फजिती बघत होते. शेवटी, प्रचंड खटपट केल्यावर, फॉर्म भरला, ॲफिडेव्हिट मिळालं आणि आम्ही अगदी कटोकटी वेळेत चेक इन केलं. या सगळ्या अडथळ्यांमधे एक अडथळा अनपेक्षितपणे सुटला. परू मधील कलाकुसरीबद्दल लिहिलेच आहे. काय घेऊ, काय नको असं झालं होतं. सामानासाठी जास्त पैसे एअरलाईनला देण्याची उधळपट्टी पटत नव्हती. सुदैवाने वेळेवर लक्षात आलं, की LATAM एअरलाईन दुप्पट सामानाची परवानगी देते. आम्ही आणखी एक मोठ्ठी बॅग विकत घेतली आणि त्यात सामान कोंबलं.

कोव्हिडच्या सुरुवातीच्या काळात 'सुटू' लागलो होतो. माचु पिचुला जायचं ठरवल्ियावर Exercycle नियमित सुटायची, व माझे सुटणे कमी झाले, आणि कोव्हिडची भीती कमी झाल्यावर प्रवासासाठी 'सुटलो', अगदी अतूट इच्छेने. कदाचित हीच इच्छाशक्ती सारे अडथळे पार करून गेली.

***

माचु पिचु येथील काही छायाचित्रे :-

